# आर्थिक नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीर

**सोमवार दिनांक ६ जानेवारी २०१४** रोजी सकाळी ११.३० वाजता मा. डॉ. राजन तुंगारे - संचालक, एम.आय.एल.सी. यांच्या हस्ते तसेच प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार, आ.वि.प्र. संस्थेचे अध्यक्ष श्री. तुषार आपटे तसेच इतर सन्माननीय विश्वस्तांच्या उपस्थितीत अतिशय उत्तमरित्या उद्घाटन सोहळा पार पडला.

या प्रसंगी डॉ. राजन तुंगारे यांनी श्रमविज्ञान संस्थेची माहिती देताना असे सांगितले की, ही श्रमविज्ञान संस्था कै. नारायण मेघाजी लोखंडे या नावाने ओळखली जाते (कारण भारतात साप्ताहिक सुट्टी ही संकल्पना त्यांनी आणली.) श्रमिकांसाठी केलेल्या या कार्याबद्दल त्यांचे नाव या संस्थेला देण्यात आले. तसेच त्यांनी आर्थिक नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीराची उपयुक्तता कथन करुन महाविद्यालयाने घेतलेल्या पुढाकाराचे अभिनंदन केले.

**प्रथम सत्र :**

त्यानंतरच्या सत्रात मा. डॉ. कल्पना हजारे - अध्यक्षा, शताब्दी महिला सहकारी बँक, ठाणे यांनी महिला व तरुणांना बचतगटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार या विषयावर उत्तम मार्गदर्शन केले. या विषयावर बोलताना त्यांनी महिलांनी बँक कशी स्थापन करावी तसेच त्या अनुषंगाने विविध प्रकारचे लघुद्योग कशाप्रकारे सुरु करावेत याबद्दल उपयुक्त माहिती दिली.

दुपारच्या सत्रात ॲड. वीणा निरगुडकर यांनी 'कायदा व सामान्य माणूस' या विषयावर बोलताना कायद्यातील बचतगटांसाठी तसेच लघुद्योगाच्या निर्मितीसाठी व त्यांची विविध ठिकाणी घ्यावी लागणारी नोंदणी या विषयावर सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर डॉ. नितीन चोणकर, संचालक, ट्विंकल केमिकल लॅब प्रा. लिमीटेड यांनी खाद्यपदार्थ आणि औषधांचा टिकाऊपणा वाढविण्यासाठी लागणारा पदार्थ बनविण्याच्या प्रक्रियेबद्दल व त्यासाठी लागणारे नियोजन याबद्दल माहिती विद्यार्थीनीच घेतलेल्या मुलाखतीतून अतिशय रंजकपणे दिली.

श्री. विनोद जडे, उद्योजक यांनी त्यांच्या रबर उत्पादनासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाच्या प्रदीर्घ अनुभवाचे व निर्यात विषयक धोरण याबद्दल महिला व तरुणांशी संवाद साधला.

**मंगळवार, दिनांक ७-१-२०१४ दुसरा दिवस**

मंगळवार, दिनांक ७ जानेवारी २०१४ रोजी सकाळी जेष्ठ व प्रसिध्द लेखक बाळ सडवेलकर यांनी 'जागतिकीकरण आणि उद्योजकता विकास' या विषयावर बोलताना त्यांनी जीवनाच्या पाच मंत्रांची माहिती देत सकारात्मक दृष्टीकोनाची आवश्यकता नमुद करताना सर्व विद्यार्थ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला देऊन आयुष्याच्या गणितावर लक्ष केंद्रित करण्यावर भर दिला. यशस्वी होण्याचा पहिला मंत्र स्वओळख, दुसरा मंत्र ध्येय निश्चिती, तिसरा मंत्र अभिरुची, चौथा मंत्र माहिती संकलन तर पाचवा मंत्र आर्थिक नियोजन असल्याचे सांगितले.

श्री. नागेश केसरी संचालक, वि. स. पागे इन्स्टिट्युट, मुंबई यांनी 'संसदीय लोकशाही : मूलभूत हक्क व अधिकार' या विषयावर बोलताना संसदेत चालणारे कामकाज तसेच Vote on Account, Zero Hours, अशा विविध विषयांवर उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

**बुधवार दिनांक ८ जानेवारी २०१४** रोजी सकाळी ११.०० वाजता डॉ. वैदेही दप्तरदार प्राचार्या, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, बदलापूर यांनी महिलांना तसेच युवकांना **'ग्रामीण उद्योजकता - प्रश्न व विषय विचार'** या विषयावर उत्कृष्ट मार्गदर्शन करुन त्यांनी अनेक नवनवीन व्यवसाय सुरु करुन रोजगाराच्या संधी कशा निर्माण होतात हे सांगितले. महिला व तरुणांनी त्यांच्याशी उत्तम संवाद साधला.

दुसऱ्या सत्रात डॉ. राजगोपालन - प्राध्यापक, मॉडेल महाविद्यालय, डोंबिवली यांनी स्वयंरोजगारासाठी पैसा कसा उभा करावा यावर मार्गदर्शन करताना लघुउद्योगांसाठी उपलब्ध

असलेले भांडवल जमविण्याचे मार्ग व गरजेनुसार व्यवसायाची सूचकता असावी असे सांगितले.

तिसऱ्या सत्रात प्रा. सतिश फराटे, प्राध्यापक, आदर्श महाविद्यालय, बदलापूर यांनी प्रकल्प अहवाल कसा तयार करावा यावर मार्गदर्शन करताना व्यवसाय सुरु करण्यासाठी भांडवलाची लागणारी रक्कम व ती मिळविण्यासाठी वेगवेगळे मार्ग या विषयावर उपयुक्त मार्गदर्शन केले.

तीन दिवसीय शिबीराचा समारोप मा. श्री. तुषार आपटे अध्यक्ष, आदर्श विद्या प्रसारक संस्था यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. शिबीराच्या समारोपाच्या प्रसंगी सहभागी महिला तसेच तरुणांनी या कार्यक्रमातून त्यांना मिळालेली माहिती ही त्यांना कशाप्रकारे उपयोगात येईल व ती कशी अमलात आणू याबद्दल ग्वाही देत त्यांनी आयोजकांचे आभार मानून असा कार्यक्रम पुन्हा घेण्यात यावा असे मत व्यक्त केले.

शिबीराचे समन्वयक श्री. शैलेंद्र माने यांनी या शिबीराच्या आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे तसेच सर्व वक्त्यांचे व सहभागी महिला व तरुण वर्ग यांचे आभार मानले. महाविद्यालयातर्फे मा. प्राचार्या यांनी शिबीराच्या यशस्वी आयोजनाबाबत त्यांचे मत व्यक्त केले व त्यानंतर महाविद्यालयाचे प्राध्यापक सतिश फराटे यांनी आभार प्रदर्शन केले व समारोपाचे सुत्रसंचालन डॉ. संदीप भेले यांनी केले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**डॉ. वैदेही दप्तरदार**
प्राचार्या आदर्श कॉलेज, बदलापूर